# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे मार्च २०१८

## गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–१२,मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | दिंडोशी पोलीस ठाणे गुरक्र.१५५/१८ कलम ३०२,२०१ भादवि |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक १८/०३/१८ रोजी रात्रौ ते पहाटेच्या दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | न्यू म्हाडा कॉलनी, मंत्रीपार्क येथील शेवटच्या बेस्ट बस स्टॉपच्या दक्षिणेस, शिवशाही परिसरातील फिल्मसिटीच्या दिशेने डोंगराळ पठारावरील मैदान, शिवशाही प्रकल्प, गोरेगांव (पूर्व), मुंबई. |
| ४ | **फिर्यादी** | पोलीस उप निरीक्षक समाधान गंगाधर पवार, नेमणुक–दिंडोशी पोलीस ठाणे,मुंबई |
| ५ | **बळीत / मयत** | सदाशिव पुजारी वय अंदाजे ४० वर्षे, मुळ गांव – कर्नाटक मंगलोर |
| ६ | **आरोपी अटक** | १) खैसर पाशा सय्यद वय ४२ वर्षे,<br>२) समीर नासिर शेख वय ३८ वर्षे,<br>**अटक दिनांक २०/०३/२०१८ रोजी १०.३० वाजता** |

दिंडोशी पोलीस ठाणे गुरक्र.१५५/१८ कलम ३०२,२०१ भादवि या गुन्हयात दिनांक १८/०३/१८ रोजी रात्रौ ते पहाटेच्या दरम्यान न्यू म्हाडा कॉलनी, मंत्रीपार्क येथील शेवटच्या बेस्ट बस स्टॉपच्या दक्षिणेस, शिवशाही परिसरातील फिल्मसिटीच्या दिशेने डोंगराळ पठारावरील मैदान, शिवशाही प्रकल्प, गोरेगांव (पूर्व), मुंबई. याठिकाणी यातील अज्ञात आरोपीताने अंदाजे ४० वर्षे वयाच्या अनोळखी इसमास अज्ञात कारणाने दगडाने किंवा कठीण वस्तूने डोक्यात प्रहार करून, त्यास जिवे ठार मारून, पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचा मृतदेह फरपटत नेवून, घटनास्थळाचे डोंगराळ उताराचे भागाकडे ढकलून दिला म्हणुन फिर्यादी पोलीस उप निरीक्षक समाधान गंगाधर पवार, नेमणुक–दिंडोशी पोलीस ठाणे,मुंबई यांनी सरकारतर्फे दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १८/०३/२०१८ रोजी सदर अज्ञात इसमाविरूध्द सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–१२, मुंबई चे पथकाने नमुद गुन्हयाची माहिती मिळताच तपास सुरू केला. सदर पथकाने घटनास्थळाची बारकाईने पहाणी केली असता, प्रथमदर्शनी असे दिसुन आले की, मृतदेहाची ओळख पटु नये याकरीता मयत इसमाच्या चेहऱ्यावर दगडाने वा कठीण हत्याराने घाव घालून चेहरा विद्रुप केला होता. तसेच पुरावा नष्ट करण्याच्या हेतुने मृतदेह फिल्मसिटीच्या झाडीमध्ये उंच कडयावरून ढकलून दिल्याचेही दिसुन आले. दिवसा ढवळया नागरी वस्तीच्या परिसरात निर्घृणपणे हत्या केलेला मृतदेह मिळून आल्याने परिसरातील जनतेमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–१२, दहिसर, मुंबई यांनी अधिकारी व अंमलदारांची वेगवेगळी पथके तयार करून अज्ञात आरोपीचा शोध सुरू केला. सदर पथकाने मयत अनोळखी इसमाची ओळख पटविण्याकरीता आजुबाजुच्या परिसरातील सर्व हरविलेल्या व्यक्तींची माहिती घेतली परंतू मयत इसमाच्या वर्णनाशी मिळती जुळती वर्णनाची व्यक्ती हरविलेल्याबाबत कोणत्याही पोलीस ठाण्यास तक्रार दाखल नसल्याचे दिसुन आले. प्राप्त शवविच्छेदन अहवालामध्ये मयत इसमाने मृत्युपूर्वी मद्यप्राशन व जेवण केल्याचे आढळून आल्याने सदर पथकाने त्या अनुषंगाने सर्व हॉटेल्स, बार या ठिकाणी मयत इसमाचे फोटो दाखवून त्याची ओळख पटविण्याचे कसोशीने प्रयत्न केले.

सदर पथकाने मयताची ओळख व आरोपीबाबत माहिती प्राप्त करण्याचे दृष्टीने चौकशी करीत असतांना, नमुद घटनास्थळाचे आसपासच्या परीसरात तपास पथकास एका रिक्षा चालकानेघटनेच्या दिवशी साधारण रात्रौ ०१.३० वा चे सुमारास एक ऑटोरिक्षा घटनास्थळाचे दिशेने गेल्याचे सांगीतले. तसेच त्याने घटनास्थळाजवळ पहाटे ०२.३० वा चे सुमारास नमुद परिसरातील समीर ताडी व खैसर या दोन ऑटो रिक्षा चालक यांची अमजद नावाच्या इसमाशी भांडण झाल्याचे सांगितले. त्याप्रमाणे नमुद इसम हे पहाटे ०५.३० वा पर्यंत घटनास्थळावर हजर होते अशीही सदर रिक्षा चालकाने माहिती दिली. सदर पथकाने प्राप्त माहितीच्या आधारे नमुद दोन्ही रिक्षा चालक नामे १) मोहम्मद समीर नजीर अहमद शेख वय ३८ वर्षे व २) खैसर पाशा सय्यद वय ४५ वर्षे यांना त्यांचे राहते परीसरातुन गोपनीय माहितीद्वारे शिताफीने ताब्यात घेतले. सदर पथकाने ताब्यातील दोन्ही रिक्षा चालकांकडे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने स्वतंत्रपणे सखोल व कौशल्यपुर्वक चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची

कबुली दिली. त्यावरून सदर पथकाने आरोपी क्र. १) मोहम्मद समीर नजीर अहमद शेख वय ३८ वर्षे व २) खैसर पाशा सय्यद वय ४५ वर्षे यांना नमुद गुन्हयात दिनांक २०/०३/२०१८ रोजी १०.३० वा. रितसर अटक केली.

सदर पथकाने अटके दरम्यान आरोपीतांकडे सदर गुन्हयाचे संबंधाने कसुन चौकशी केली असता असे निष्पन्न झाले की, यातील मयत इसम व ताब्यात घेतलेल्या आरोपींपैकी खैसर पाशा सय्यद वय ४५ वर्षे यांची पुर्वीपासुन ओळख होती. मयत इसम व आरोपी खैसर व समीर हे दिनांक १७/०३/२०१८ रोजी रात्रौ १०:०० वा. एका बारमध्ये दारू पिऊन समीर याच्या रिक्षाने गोरेगाव स्टेशनकडे निघाले. यादरम्यान मयत इसमास आणखी दारू पिण्याची इच्छा झाल्याने यातील समीर याने मयताने दिलेल्या पैशातून पुन्हा दारू विकत घेतली. त्यानंतर नमुद तिघांनी जवळच असलेल्या रिक्षा स्टॅन्डमध्ये रिक्षा पार्क करून दारू प्राशन केली. मयत इसमावर दारूचा अंमल जास्त झाल्याने त्याने मोहम्मद समीर नजीर अहमद शेख व खैसर पाशा सय्यद यांना अर्वाच्य शब्दात शिवीगाळ देण्यास सुरूवात केली. सदरवेळी त्यांची आपआपसांत शारीरीक झटापट झाली. भांडणाचे दरम्यान मयत इसमाने आरोपींच्या तोंडावर ग्लासातील दारू फेकली. सदर प्रकारामुळे नमुद दोन्ही आरोपींनी मयत इसमास त्याच रिक्षाने शिवशाही प्रकल्पाजवळील मोकळया मैदानात नेऊन त्याचा प्रथम रिक्षामध्ये गळा आवळला व त्यानंतर त्याच्या डोक्यामध्ये दगड टाकुन त्याचा खुन केला. सदर पथकाने आरोपीतांकडे मयत इसमाबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्याचे नाव सदा असे असल्याचे सांगुन तो गोरेगाव परिसरातील एका बारमध्ये वेटरचे काम करीत असल्याचेही सांगितले. सदर पथकाने प्राप्त माहितीवरून नमुद परिसरातील हॉटेलमधील कर्मचाऱ्यांना मयताचे फोटो दाखविले असता, त्यांनी त्यास ओळखून त्याचे नांव सदाशिव पुजारी, मुळ गांव – कर्नाटक मंगलोर असे असल्याचे सांगितले.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–१२, मुंबई चे पथकाने नमुद दोन्ही अटक आरोपीतांना गुन्हयाचे पुढील तपासकामी दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई यांना रितसर ताब्यात दिले.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–१२, मुंबई चे पथकाने कोणताही तांत्रिक पुरावा नसताना मानवी कौशल्याचे आधारे केवळ वैयक्तिक स्तोत्राद्वारे माहिती प्राप्त करून पूर्व वैमनस्यातून कपडयाने गळा आवळुन व दगडाने ठेचून जिवे ठार मारणाऱ्या दोन आरोपीतांना **अवघ्या ३६ तासात अटक करून** सदर खुनाचा गंभीर गुन्हा उघडकीस आणुन मयत इसमाचीही ओळख पटविण्यात यशस्वी झाले.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना मार्च – २०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा,कक्ष–१२,मुंबई .तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव | अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव |
|---|---|---|---|
| ०१ | सहा.पो.आयुक्त अभय रामराव शास्त्री | १२ | पो.ह.क्र.२८०४७/सुधाकर प्रेमानंद कोकाटे |
| ०२ | प्र. पो. निरीक्षक सुनिल दत्ताराम जाधव | १३ | पो.ह.क्र.२५२९०/प्रभाकर रघुनाथ सुर्वे |
| ०३ | पो. निरीक्षक महेश धनंजय निवतकर | १४ | पो.ना.क्र.५२९७/मंगेश शशिकांत तावडे |
| ०४ | पो.निरीक्षक सचिन राजाराम गवस | १५ | पो.ना.क्र.१४८९८/ऑस्कर व्हिक्टर कोलासो |
| ०५ | स.पो.निरीक्षक विक्रमसिंह दत्तात्रय कदम | १६ | पो.ना.क्र.३४१९१/अशोक श्रीमंत खोत |
| ०६ | स.पो.निरीक्षक अतुल शांताराम आव्हाड | १७ | पो.शि.क्र.९८०८६९/सचिन सदाशिव सावंत |
| ०७ | स.पो.निरीक्षक प्रकाश चंद्रकांत सावंत | १८ | पो.ह.क्र.२२४७४/परशुराम दामोदर साळुंके |
| ०८ | स.पो.उ.नि. १९८६०/बाळकृष्ण श्रीपत लाड | १९ | पो.ह.क्र. २८६७७/अरविंद अनंत म्हामुणकर |
| ०९ | स.पो.उ.नि.६५६४/विजय लक्ष्मण कदम | २० | पो.ह.चा.क्र.३११७८/सुमंत शंकर भोसले |
| १० | पो.ना.क्र.९६०३७१/दिपक कृष्णा वारे | २१ | पो.ह.चा.क्र.३११९७/अण्णा ज्ञानदेव मोरे |
| ११ | पो.ह.क्र.२५२४०/विलास कुंडलिक गरड | –– | –– |

——— ००० ———